ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारीं
प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, ६ मे, १९६४ | अंक ९


# शेतीचे उत्पादन वाढलेच पाहिजे




शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी

शेतीचे उत्पादन वाढणे ही आपल्या देशाची प्रमुख गरज आहे आणि त्यासाठी महाराष्ट्र सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करून शेतकऱ्यांना सहाय्य देत आहे.



तिसऱ्या योजनेच्या अखेरीस अन्नधान्याचे उत्पादन ७८.६ लाख टन होईल अशी अपेक्षा आहे, तर राज्याची अंदाजित गरज ९२.९ लाख टन आहे. अशा प्रकारें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर राज्यात १४.३ लक्ष टन अन्नधान्याची तूट पडेल. म्हणून शेतकऱ्यांनी नजीकच्या भविष्यकाळात अन्नधान्याच्या बाबतीत राज्य स्वयंपूर्ण करण्याकरितां अधिकाधिक प्रयत्न केले पाहिजेत.

राज्य अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण होण्यासाठी



ऊस, कापूस व तेलबिया या नगदी पिकांच्या उत्पादनाच्या कार्यक्रमात वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी सुधारलेले बी-बियाणें, खते यांचे वाटप करणाऱ्या आणि शेतीसाठीं कर्ज देणाऱ्या विकास संघटनांची भक्कम पायावर उभारणी करण्यात आली आहे.

अत्यावश्यक अशा कच्च्या मालाचा उद्योगधंद्यांना पुरवठा करण्यासाठी

प्रकाशन संचालक, महाराष्ट्र शासन

## जागतिक प्रदर्शनांतील भारतीय दालन

न्यू यॉर्कमध्यें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांत भारतानें आपलें एक दालन उघडलेलें आहे. गेल्या महिन्याच्या २२ तारखेस प्रदर्शन खुलें करण्यांत आलें. तेव्हांपासून रोज हजारों लोक भारतीय दालनाला भेट देत आहेत. ह्या दालनांत प्रेक्षकांना भारतीय संस्कृतीचा वारसा तर पाहावयास मिळतोच, पण ४५ कोटी लोकांच्या जीवनाला नवें वळण देण्याचा प्रयत्न करणाऱ्या जगांतील सर्वांत मोठ्या लोकशाहीचीहि ओळख होते. भारताचें दालन फारसें भव्य नाहीं. परंतु त्याच्या रूपानें भारताचें एक छोटेसें प्रतिबिंबच उभारण्यांत आलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. भारताचा भूतकाळ, त्याची सद्य:स्थिति व आकांक्षा ह्यांचें रमणीय चित्र दालनामुळें प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर उभें राहतें. त्यांत भारताचें दारिद्र्य जसें पाहावयास मिळतें तशीच भारताची प्रगतीहि पाहावयास मिळते. कुडाच्या भिंतीच्या घराबरोबरच टोलेजंग हवेल्याहि पाहावयास मिळतात; आणि हस्तव्यवसायांच्या वस्तूंना सोबत करणाऱ्या अणुभट्ट्याहि दिसून येतात. बहुतेक अमेरिकन प्रेक्षकांना दालन पाहतांना आश्चर्याचे धक्के बसतात. ज्यांना भारताची माहिती नसते ते प्रेक्षक नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून आपली जिज्ञासा तृप्त करण्याचे प्रयत्न करतात. पण पुष्कळांना भारताच्या दालनांत कांहीं बघण्यासारखें असेल असें वाटत नसल्याचें आढळून येतें. अशा लोकांनीं विचारलेल्या प्रश्नांवरून भारताच्या दालनाचा त्यांच्यावर प्रभाव पडल्याचें उघड दिसून येतें.

---

## हातमागाच्या कापडाला वाढती मागणी

न्यू यॉर्कमध्यें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांत भारतानें भाग घेतलेला आहे. हें प्रदर्शन १९६४ व ६५ सालीं एप्रिल ते ऑक्टोबरच्या दरम्यान चालू राहणार आहे. ह्या दोन्ही वर्षी भारत सुमारें १० लाख रुपये किंमतीच्या हातमागावरील कापडाची विक्री करील असा अंदाज आहे. त्याशिवाय ह्या वर्षी २२ लाख रुपये किंमतीच्या हस्तव्यवसायाच्या मालाचीहि विक्री होण्याची शक्यता आहे. ह्या मालाचा खप वाढावा म्हणून संबंधित निर्यात कॉर्पोरेशननें बरेच उपाय योजले आहेत. त्यामुळें हातमागाच्या कापडाची परदेशांतील मागणी बरीच वाढणार आहे. १९५८ सालीं भारतानें ५० लाख रुपयांचें हातमागाचें कापड निर्यात केलें होतें. १९६२ सालीं ३ कोटी रुपयांच्या कापडाची निर्यात करण्यांत आली आणि १९६३ सालीं तर ४ कोटी रुपयांपेक्षाहि अधिक मालाची निर्यात करण्यांत आली. आंध्र व मद्रास राज्यांत तयार होणारें विशिष्ट प्रकारचें कापड अमेरिकेंत निर्यात करण्याच्या बाबतींत चांगलें यश मिळालें आहे. न्यू यॉर्कमधील प्रदर्शनाच्या कमिटीनें सूचना केल्यावरून कलाकुसरीच्या कामाच्या जुन्या वस्तु प्रदर्शनांत विकण्याचा निर्णय घेण्यांत आला. अशा प्रकारच्या मालाच्या निर्यातीला भारत सरकारची परवानगी लागते. ह्यासंबंधींच्या नियमांचा विचार करून प्राचीन कलाकुसरीचे नमुने मिळविण्यांत येत आहेत. अशा प्रकारच्या कलापूर्ण वस्तूंना परदेशांत चांगली मागणी आहे. त्याचा फायदा घेऊन ह्या वस्तूंचा चोरटा व्यापारहि अस्तित्वांत आला आहे. ह्या वस्तूंच्या विक्रीसाठी प्रदर्शनाच्या भारतीय मंडपांत एक खास विभाग उघडण्यांत आला आहे.

---

## राजस्थानमधील अणुवीजकेंद्रासाठी करार

औद्योगीकरण घडवून आणण्यासाठी औद्योगिक कारखान्यांना लागणाऱ्या शक्तीची सोय प्रथम करावी लागते. भारताच्या पूर्व भागांत कोळसा विपुल असला तरी इतर ठिकाणीं ह्या औद्योगिक इंधनाचा पुरवठा मुद्दाम करावा लागतो. म्हणून ज्या भागांत कोळसा सांपडत नाहीं त्या भागांत अणुशक्तीच्या साह्यानें विजेच्या औद्योगिक शक्तीचें उत्पादन करणें इष्ट ठरतें. राजस्थानमध्यें अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पादन करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या केंद्रासाठी भारत आणि कॅनडा ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. करारांतील अटींना अनुसरून भारताला ३·७ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्यांत येणार आहे. हें कर्ज कॅनडाच्या एक्सपोर्ट्स् क्रेडिट्स् इन्शुरन्स कॉर्पोरेशनतर्फे पुरविण्यांत येईल आणि त्याचा उपयोग केंद्रासाठी लागणारीं साधनें कॅनडांत विकत घेण्यासाठी करण्यांत येईल. राजस्थानांतील ह्या संकल्पित अणुवीजकेंद्राची उत्पादनक्षमता २ लाख किलोवॅट असेल. तें उभारण्यासाठी ७·४ कोटी डॉलर्स खर्च येईल. त्यांपैकी परदेशीय चलनाच्या स्वरूपांत लागणाऱ्या खर्चाची तरतूद वरील कर्जानें करण्यांत आली आहे. अणुशक्तीवरील वीजकेंद्र उभारण्यासंबंधीं कॅनडाशीं करार करण्यास विशेष कारण आहे. अणुवीज उत्पन्न करणाऱ्या केंद्रासाठी कॅनडा ज्या प्रकारचें आण्विक इंधन वापरतो त्या प्रकारचें इंधन भारतांत तयार होऊं शकतें आणि तें तयार करण्यासाठीं लागणारा कच्चा मालहि भारतांत विपुलतेनें उपलब्ध आहे. राजस्थानांतील वीजकेंद्र १९७० सालीं चालू होईल.

---

## ईफेल मनोऱ्याचा ७५ वा वाढदिवस

पॅरिस शहराची आठवण झाल्यावर तेथील जगप्रसिद्ध ईफेल मनोऱ्याची स्मृति जागी झाल्याशिवाय कशी राहील? फ्रान्समधील ह्या वैशिष्ट्यपूर्ण मनोऱ्यानें आपला ७५ वा वाढदिवस नुकताच साजरा केला. हा बांधण्याच्या कल्पनेकडे प्रथम उपहासानेंच बघण्यांत येत होतें, आणि १९०९ सालीं तर तो उखडूनहि टाकण्यांत येणार होता. कारण, त्याला दिलेली परवानगी त्या सालीं संपत होती. पण जगांतील ह्या सर्वांत उंच मनोऱ्याची वेळ आली होती, काळ मात्र आला नव्हता. त्याच सुमारास रेडिओचा शोध लागलेला होता आणि मनोऱ्याचा उपयोग ध्वनिक्षेपणासाठी करतां येईल असें दाखवून दिल्यामुळें त्याला जीवदान मिळालें. आतां ह्या मनोऱ्यावरून पॅरिस विभागांतील दूरचित्रवाणीचे कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत येत असतात. गेल्या महायुद्धांत कोणालाहि मनोऱ्यावर जाण्याची परवानगी मिळत नसे. लष्कराच्या ध्वनिक्षेपणासाठीच फक्त त्याचा उपयोग करण्यांत येत असे. मनोरा ज्या वर्षी प्रथम खुला करण्यांत आला त्या वर्षी २० लाख लोक तो चढून गेले. गेल्या वर्षी तर ह्याहीपेक्षा अधिक लोकांनीं त्यावर आरोहण केलें. मनोऱ्याची उंची १,०५२ फूट असून त्याच्या शिखरावरून स्वच्छ हवेंत ४२ मैलांच्या परिघांतील प्रदेश चांगला दिसूं शकतो. दिल्लींतील कुतुबमिनारावरून उडी घेऊन आत्महत्त्या करण्यांत येतात; तसाच प्रकार ह्याहि मनोऱ्याच्या बाबतींत आहे. आत्मघात करणाऱ्यांना ह्या मनोऱ्याचें विलक्षण वेड आहे. मनोऱ्याच्या मागील वाढदिवशीं असाच दुःखद प्रकार घडला होता. त्यावरून शरीर झोकून देऊन जीवन संपविण्याचा हा ३२९ वा प्रसंग होता.

# अर्थ

बुधवार, ६ मे, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांच्या कारभाराची सुधारणा

### लहान बँकांसाठी मद्रास येथें भरविलेलीं शिबिरें

लहान आणि मध्यम आकाराच्या मुख्य अधिकाऱ्यांचा शिबिरें रिझर्व्ह बँकेनें गेल्या वर्षी भरविलीं, त्यांचा अहवाल रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केला आहे. १९५४ पासून रिझर्व्ह बँक बँकर्स ट्रेनिंग कॉलेज चालवीत आहे. परंतु, बँकांच्या वरिष्ठ नोकरवर्गाच्या ट्रेनिंगची गरज त्या कॉलेजानें भागत नाहीं असें आढळून आलें आहे. लहान बँका बँकर्स ट्रेनिंग कॉलेजचा पुरेसा फायदा करून घेऊं शकत नाहींत. लहान बँकांचें आर्थिक क्षेत्रांतील महत्त्व लक्षांत घेऊन त्यांच्या अधिकाऱ्यांच्या ट्रेनिंगचा प्रश्न तांतडीनें सोडविणें आवश्यक होतें. ह्यासाठी रिझर्व्ह बँकेनें मद्रास येथें तीन शिबिरें भरविलीं. लहान बँकांच्या अधिकाऱ्यांना एकमेकांशीं, त्याचप्रमाणें रिझर्व्ह बँकेच्या आणि कांहीं मोठ्या व्यापारी बँकांच्या अधिकाऱ्यांशीं चर्चा आणि विचारविनिमय करतां यावा, हा त्यांचा उद्देश होता.

ह्या शिबिरांत व्यापारी बँकांच्या कारभाराच्या सर्व अंगोपांगांची चर्चा झाली. लोकांची बचत बँकेकडे कशी आकृष्ट करावी, सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीचें आणि कर्जाचें धोरण काय असावें, नफ्याची वांटणी कशी करावी, नोकरवर्गाची नेमणूक कशी करावी, त्यांच्या ट्रेनिंगची व्यवस्था कशी करावी, ह्या बाबींचा त्यांत समावेश होता. सुरक्षितता, तरतेपणा आणि किफायतशीरपणा ह्या परस्परविरोधी गोष्टींकडे लक्ष देऊन व्यापारी बँकांना भागदार, ठेवीदार आणि कर्जदार ह्यांचेबाबत कर्तव्यें पार पाडावयाचीं असतात. ह्या मुद्द्यावर साहजिकच भर होता. चांगल्या बँका सरकारी आणि ट्रस्टी रोख्यांत पैसे कसे गुंतवितात, वेगवेगळ्या तारणांवर कर्ज देतांना कोणत्या पद्धतीचा अवलंब करतात आणि दक्षता कोणत्या घेतात, पत कशी अजमावतात, जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या ताळेबंदाची छाननी करण्याचें आधुनिक तंत्र कोणतें आहे, इत्यादि बाबींवर चर्चा झाली.

डायरेक्टरांना कर्जें, जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या भागांचे तारणावर कर्जें, चीफ एक्झिक्यूटिव्हची भूमिका, रिझर्व्ह बँकेचे व्यापारी बँकांशीं नातें, शाखांचें नियंत्रण व त्यांची देखरेख, नोकरवर्गाच्या ट्रेनिंगच्या सोई हेहि विषय शिबिरांत चर्चिले गेले. अहवालाचें अखेर व्यापारी बँकांच्या उपयोगासाठी नमुन्यांचे फॉर्म छापले आहेत; पत अजमावण्याचे बाबतींत आणि शाखांचे देखरेखीचे कामीं त्यांचा लहान बँकांना विशेष उपयोग होईल.

## हिंदुस्थान लिव्हर

हिंदुस्थान लिव्हर कंपनीनें १९६३ सालीं ५९·५५ कोटी रुपयांची उलाढाल करून ४·३१ कोटी रु. नफा मिळविला. १९६२ चे मानानें उलाढाल १०·६% वाढली तरी नफा ९·६% कमी झाला. कंपनीचें मुख्य उत्पादन साबण आणि वनस्पति तूप ह्यांचें आहे. कंपनीनें ५·१२ कोटी रु. किमतीच्या मालाची निर्गत केली. १९६२ चे मानानें १९६३ सालीं निर्गत अडीचपट झाली.

## मद्रास राज्यांतील एका खेड्याची पाहणी

हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून ग्रामीण भागांतील लोकांचें राहणीचें मान सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. ह्या प्रयत्नांना यश येणें कितपत शक्य आहे हें पाहण्यासाठी मद्रास ख्रिश्चन कॉलेजनें एका खेड्याच्या आर्थिक जीवनाची पहाणी केली आहे. ही पाहणी प्रथम १९५२ च्या जुलैमध्यें करण्यांत आली आणि गेल्या ऑक्टोबरमध्यें प्रगति अजमावण्यासाठी फेरपाहणी करण्यांत आली. ग्रामीण भागांसाठी आखलेल्या विकासाच्या योजनांमुळें लोकांना पूर्वीपेक्षा रोजगारी सतत मिळूं शकते आणि त्यांच्या दरडोई उत्पन्नांतहि भर पडते असें पाहणींत आढळून आलें आहे. काम करूं शकणाऱ्या माणसाची पैसा मिळविण्याची सरासरी पात्रता चौपट वाढल्याचें आणि दरडोई उत्पन्नांत ५० टक्के वाढ झाल्याचें दिसून आलें. पहिल्या पहाणीच्या आणि दुसऱ्या पाहणीच्या कामांत ह्या खेड्यांत न कमावणाऱ्या लोकांच्या संख्येंत वाढ झालेली होती. तरीहि दरडोई उत्पन्नांत वाढ झालेली दिसली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. काम करींत असलेल्या लोकांपैकीं ७५ टक्के लोकांना १९६२ सालीं वर्षभर काम मिळालें. १९५२ सालीं फक्त ४३ टक्के लोकांनाच वर्षभर काम मिळालें होतें. १९६२ सालीं फक्त ७ कुटुंबांचें उत्पन्न सालीना १ हजार रुपयांपेक्षा अधिक होतें. १९६२ सालीं अशा कुटुंबांची संख्या ३१ पर्यंत वाढलेली आहे. गांवकऱ्यांनीं घेतलेल्या कर्जावर ४ टक्क्यांपासून १५० टक्क्यांपर्यंत व्याज दिलेलें आढळून आलें. कुटुंबांच्या एकूण संख्येपैकीं ६४ टक्के कुटुंबें १९६२ सालींहि कर्जबाजारी असलेलीं दिसलीं. तरीपण कांहीं कुटुंबें उत्पन्नाच्या वरच्या गटांत गेलेलीं आहेत.

## आहाराच्या संवयी बदलण्याची जरुरी

भारत सरकारच्या अन्न व शेतीखात्याला अनौपचारिक सल्ला देण्यासाठी लोकसभेच्या सभासदांतून एक कमिटी नेमण्यांत आलेली आहे. ह्या कमिटीपुढें देशांतील अन्नधान्यपरिस्थितीविषयीं बोलतांना अन्नमंत्री सरदार स्वरणसिंग म्हणाले कीं ज्या लोकांच्या आहारांत तांदळाचा अंतर्भाव प्रामुख्यानें आहे, त्यांनीं आपल्या खाण्याच्या संवयींत बदल करणें आवश्यक आहे. आहारांत इतर अन्नधान्यांचा, विशेषत: गव्हाचा वापर करण्यास त्यांनीं शिकलें पाहिजे. कारण, तांदळाचा जगभर सर्वत्रच तुटवडा आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतून मोठ्या प्रमाणावर तांदूळ मिळणें अशक्य आहे. जास्तींत जास्त ५० ते ६० लाख टन तांदूळ मिळूं शकेल. हा तांदूळ भारताच्या तांदळाच्या एकूण उत्पादनाच्या एकषष्ठांश अगर एकसप्तमांश आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतून गहूं आणि मका एवढींच अन्नधान्यें मोठ्या प्रमाणावर मिळूं शकतील. तेव्हां तांदळाचें खाणें खाणाऱ्यांनीं आपल्या जिभेला वेगळ्या अन्नधान्याची ओळख करून दिल्याशिवाय भागण्यासारखें नाहीं. भारतामधील शेतीच्या धंद्याला आर्थिक साह्य देण्याच्या सूचना करण्यांत येत असतात; परंतु अशी मदत

देण्यापूर्वी ज्या उत्पादन विभागावर हा भार टाकतां येईल असा एखादा विभाग असला पाहिजे. तसा तो असेल तरच शेतीला आर्थिक मदत देण्याचा विचार करतां येतो. हिंदमधील ७० टक्के लोक योगक्षेमासाठी शेतीवर अवलंबून आहेत. अशा परिस्थितींत त्यांना आर्थिक मदत करावयाची झाल्यास बाकीच्या ३० टक्के लोकांवर कराचें ओझें लादावें लागेल. दुसरा मार्ग उपलब्ध नाहीं.

### ठेवीदारांनीं पैसे मागितलेच नाहीं

१९६२ सालीं चीननें भारतावर आक्रमण केल्यानंतर रिझर्व्ह बँकेनें बँक ऑफ चायनाचा परवाना रद्द केला होता. त्यानंतर त्या बँकेचा कारभार गुंडाळण्यांत आल्यावर ठेवीदारांनीं आपले हक्क शाबीत करण्यासाठी अर्ज करावेत अशी नोटीस जाहीर करण्यांत आली होती. परंतु बँकेच्या अनेक ठेवीदारांनीं असे अर्ज दाखलच केले नाहींत. डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशन प्रत्येक ठेवीदाराला त्याच्या १,५०० रुपयांपर्यंतच्या ठेवीच्या परतफेडीची हमी घेते. कोणत्याहि बँकेचा कारभार गुंडाळला गेल्यावर ह्या मर्यादेपर्यंत रक्कम परत करण्याची जबाबदारी कॉर्पोरेशनवर साहजिकच येते. बँक ऑफ चायनाच्या बऱ्याच ठेवीदारांनीं आपल्या हक्काची शाबिती करण्याचा प्रयत्न न केल्यामुळें कॉर्पोरेशनला ३·१९ लाख रुपये रक्कम द्यावी लागली नाहीं.

### नॉर्वेची भारताला मदत

आंतरराष्ट्रीय विकासकार्याला मदत करणारी एक निमसरकारी नॉर्वेजिअन संघटना आहे. संघटनेनें एप्रिल, १९६४ सालीं सुरू झालेल्या आर्थिक वर्षासाठी २ लाख, ४० हजार पौंडांची रक्कम भारतामधील निरनिराळ्या प्रकल्पांसाठी मंजूर केली आहे. ह्या रकमेमधून भारतांत मच्छिमारीच्या धंद्याला मदत करण्याचीं केंद्रें काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक म्हैसूर येथें आणि एक मद्रास येथ काढण्यांत येईल. ११ वर्षांपूर्वी अशींच दोन केंद्रें कोचीन व क्विलॉन येथें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत.

### लोहखनिजाच्या निर्यातीसाठी जारीचे प्रयत्न

लोखंडाच्या खनिजांची निर्यात जास्तींत जास्त करतां यावी म्हणून भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांचा विकास करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. आंध्र राज्याच्या किनाऱ्यावर असलेल्या कोकोनाडा बंदराचा ह्या दृष्टीनें विचार करण्यांत येत आहे. राष्ट्रीय खनिज विकासमंडळानें दरसाल ४० लाख टन लोहखनिज जपानला निर्यात करण्याचें निश्चित केलें आहे. विशाखापट्टम बंदरांतून दरसाल १५ लाख खनिज निर्यात करतां येण्याच्या सोयी आहेत. सोयी वाढविण्याचे प्रयत्नहि करण्यांत येत आहेत. तरीहि विशाखापट्टम् बंदराला सर्वच भार सहन करता येणें कठीण जाणार असल्यानें कोकोनाडासारख्या दुसऱ्या बंदराचा विकास घडवून आणणें आवश्यक झालें आहे.

### ब्रह्मदेशांतून येणारे नवे निर्वासित

पूर्व पाकिस्तानांतून येणाऱ्या निर्वासितांत आतां ब्रह्मदेशांतून येणाऱ्या हिंदी निर्वासितांची भर पडणार आहे. ब्रह्मदेशाच्या क्रांतिकारक सरकारनें व्यापाराचें राष्ट्रीयीकरण केल्यानें तेथील हिंदी नागरिक निर्वासित झाले आहेत. रंगूनमधील हिंदी दूतावासाच्या कचेरीसमोर निदर्शनें करून त्यांनीं स्वतःला निर्वासितांचा दर्जा यावा अशी मागणी भारत सरकारकडे केली आहे. राजकीय उलाढालीमुळें निर्वासित झालेले २० हजार हिंदी नागरिक ह्यापूर्वीच भारतांत आले असून आणखी ८० हजार नागरिकांनीं भारतांत परत जाण्यासाठी वकिलातीकडे अर्ज केले आहेत.


## दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २३ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ-पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सची सोय करण्यांत आली आहे.

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.

रजिस्टर्ड ऑफिस
राजवाडा चौक
सांगली.

एम्. के. गुप्ते
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.

दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

## पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ – पुणें शहर.

व्याजाचे नवीन आकर्षक दर–

| | |
|---|---|
| चालू ठेव | १½ टक्के |
| सेव्हिंग्ज | ३ टक्के |
| **कायम ठेव–** | |
| १ महिना | २·३७ टक्के |
| ३ महिने | ३·५० टक्के |
| ६ महिने | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ४ टक्के |
| २ वर्षें | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ४·५० टक्के |

याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या. सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# महाराष्ट्र लिमिटेड

## १९६३ चा ताळेबंद

| ३१-१२-१९६२ रुपये | जिंदगी व येणें | रु. न. पैसे | रु. न. पैसे |
|---|---|---|---|
| | **१ रोख रक्कम** | | |
| | **जवळील रोकड शिल्लक व रिझर्व्ह बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडियाकडे असलेली शिल्लक** | | |
| २,४८,४८,४५२ | **तिच्या पोट बँका धरून** (परराष्ट्रीय चलनी नोटा धरून) | | २,९१,६५,६८९·३३ |
| | **२ इतर बँकांकडील शिल्लक—** | | |
| | (अ) चालू खात्यांत | | |
| १५,१९,८७७ | (१) भारतांत रु. १६,८०,५५८·९२ | | |
| १३,११,६७८ | (२) भारताबाहेर रु. १३,५६,३५९·५६ | ३०,३६,९१८·४८ | |
| | (ब) ठेव खात्यांत | | |
| ५०,००,००० | भारतांत ... | नाहीं | ३०,३६,९१८·४८ |
| १,००,००,००० | **३ मागणी करतांच मिळणाऱ्या व अल्प मुदतीच्या ठेवी ...** | | नाहीं |
| | **४ गुंतवणूक**—कर्जरोखे-परतफेडीच्या अगर कमी दरानें. | | |
| | (१) मध्यवर्ती व राज्य सरकारांचे कर्जरोखे व इतर विश्वस्त कर्जरोखे, मध्यवर्ती सरकारचीं ट्रेझरी बिलेंसुद्धां. | | |
| | (यांपैकीं रु. २,५३,८३,०००/– दर्शनी किमतीचे रोखे कर्जाच्या तजविजीसाठी केलेल्या व्यवस्थेसाठी बँकांकडे आहेत) | | |
| | (बाजारभाव रु. ११,८१,३९,३३७·१०) | | |
| ८,२४,२३,४३१ | (दर्शनी किंमत रु. १२,०१,७३,०००·००) | ११,८१,३२,६५६·५५ | |
| | (२) **कंपन्यांचे भाग**—खरेदीच्या अगर कमी दरानें : | | |
| | साधारण भाग (पूर्ण भरणा झालेले) | | |
| | (बाजारभाव रु. २४८०,४८०·२५) रु. २४,१०,९६३·३७ | | |
| | अग्रहक्काचे भाग (पूर्ण भरणा झालेले) | | |
| | (बाजारभाव रु. २०,९१,४६०·७५) रु. २०,८१,५५९·१५ | | |
| | साधारण भाग (अंशतः भरणा झालेले) | | |
| ३७,५५,०४६ | (बाजारभाव रु. ५९,३३६·००) रु. ४९,१४१·२५ | ४५,४१,६६३·७७ | |
| | (३) इतर कर्जरोखे-खरेदीच्या दरानें | | |
| ८८,३१,६९५ | (बाजारभाव रु. १,१३,५३,६४५·००) | १,१३,३०,४७०·२० | |
| नाहीं | (४) सोनें | नाहीं | १३,४०,०४,७९०·५२ |
| ९,५०,१०,१७२ | | | |
| | **५ दिलेलीं कर्जे** | | |
| | (संशयित व बुडित कर्जे खेरीज करून. त्यांसाठी हिशेबतपासनिसांना समाधानकारक अशी तरतूद केली आहे.) | | |
| ११,०९,१४,९७७ | (१) **कर्जें, कॅश क्रेडिट व ओव्हरड्राफ्ट खातीं** | | |
| | (१) भारतांत* रु. १३,४६,०४,९९३·७६ | | |
| | * (या रकमेंतून मध्यम मुदतीच्या कर्जासाठीं रिफायनान्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री लि. यांचेकडून घेतलेली रक्कम रु. ५,७५,५८२·८८ समाविष्ट आहे. देणें बाजूकडे दाखविल्याप्रमाणें.) | | |
| नाहीं | (२) भारताबाहेर नाहीं | १३,४६,०४,९९३·७६ | |
| | (२) **खरेदी केलेलीं बिलें** | | |
| | (मध्यवर्ती व राज्य सरकारांचीं ट्रेझरी बिलें खेरीज करून) | | |
| ७३,४३,६०५ | (१) भारतांत वसूल होणारीं रु. ८३,०५,२८८·७७ | | |
| ८२,९८२ | (२) भारताबाहेर वसूल होणारीं रु. १,१५,१२७·८१ | ८४,२०,४१६·५८ | १४,३०,२५,४१०·३४ |
| | **दिलेल्या कर्जाचा तपशील—** | | |
| ९,७३,६१,८६४ | (१) पूर्ण तारणावरील कर्जे | ११,८४,८३,६३४·२० | |
| | (२) कर्जदारांच्या वैयक्तिक जबाबदारीवर दिलेलीं | | |
| ६३,३८,१११ | (सुरक्षित) | ६५,७४,५४२·६६ | |
| | पुढील पानावर पाहा ... | १२,५०,५८,१७६·८३ | ३०,९२,३२,८०८·६७ |

# दि बँक ऑफ

## दि. ३१ डिसेंबर,

| ३१-१२-१९६२ रुपये | भांडवल व देणें | रु. न. पैसे | रु. न. पैसे |
|---|---|---|---|
| | मागील पानावरून ... | | ३१,०५,१३,१३३·७९ |
| | **६ वसुलीसाठी आलेले चेक, हुंड्या, बिलें वगैरे** | | |
| | ( येणें बाजूकडे दाखविल्याप्रमाणें ) | | |
| २,०३,६४,९२६ | ( १ ) भारतांत वसूल होणारी ... | २,८५,८६,०४०·७६ | |
| १६,४३,११० | ( २ ) भारताबाहेर वसूल होणारीं | १६,३०,२१३·०४ | ३,०२,१६,२५३·८० |
| | **७ इतर देणीं** | | |
| ३८,०५७ | मागणी न केलेलें डिव्हिडंड | ३५,३०३·६० | |
| | वटविलेल्या बिलांवरील पुढील वर्षापोटीं | | |
| ५,५२६ | जमा झालेली कसर ... | ७,०६६·४५ | |
| ३१,३०,०३३ | शाखांतर्गत हिशेब | ४९,२१,०६४·८९ | ४९,६३,४३४·९४ |
| | **८ खातेदारांकरितां पत्करलेल्या जबाबदाऱ्यां** | | |
| २,१९,३४,६२४ | ( येणें बाजूकडे दाखविल्याप्रमाणें ) | | २,५५,२३,४१९·४७ |
| | **९ नफा-तोटा खातें :—** | | |
| ३,७७,२३० | मागील ताळेबंदाप्रमाणें | ४,३४,९६२·२५ | |
| ३,३४,८८० | वजा-वांटणी केलेला | ३,८७,५५०·६० | |
| ४२,३५० | | ४७,४११·६५ | |
| ८,४२,६१२ | चालू सालचा निव्वळ नफा | ९,००,२१३·५४ | |
| ८,८४,९६२ | नफा-तोटा पत्रकावरून आलेला | ९,४७,६२५,१९ | |
| | वजा-वर्ग केलेल्या रकमा | | |
| ४,५०,००० | गंगाजळी रु. ४,००,०००·०० ... | — | |
| नाहीं | डिव्हिडंड निधि ५,००,०००·०० ... | ९,००,०००·०० | ४७,६२५·१९ |
| ४,३४,९६२ | | | |
| | **१० संभाव्य देणीं** | | |
| ६,७१,३००० | ( १ ) बँकेच्या गुंतवणुकींतील सामुदायिक भांडवलाच्या कंपन्यांच्या अंशतः भरणा झालेल्या भागांवरील ( पोट कंपनीचे भाग धरून ) न मागविलेली रक्कम ... | १,३८.१८०·०० | |
| २९,४३,९९९ | ( २ ) खातेदारांकरितां दिलेल्या हम्या | १४,४५,२२३·०० | |
| | **टीप :** | | |
| | ( १ ) नोकर वर्गास पुढील काळांत द्याव्या लागणाऱ्या ग्रॅच्युइटीची रक्कम निश्चित केलेली नसून त्याची पूर्णपणें तरतूद केलेली नाहीं. | | |
| | ( २ ) संचालकांनीं द. सा द. शें. ९ टक्के, वसूल रकमेच्या प्रमाणांत ( प्रोरेटा ) करपात्र डिव्हिडंड देण्याची शिफारस केली आहे. ही शिफारस भागधारकांच्या दि. २-४-१९६४ रोजीं होणाऱ्या सभेंत मंजूर झाल्यास सदर डिव्हिडंड, डिव्हिडंड रिझर्व्हमधून दिलें जाईल. यासाठी वेगळी तरतूद केलेली नाहीं. | | |
| ३०,५५,४७,७२६ | एकूण ... | | ३७,१२,६३,८६७·१९ |

# महाराष्ट्र लिमिटेड

## १९६२ चा ताळेबंद

| ३१-१२-१९६२ रुपये | जिंदगी व येणें | रु. न. पैसे | रु. न. पैसे |
|---|---|---|---|
| | मागील पानावरून ... | १२,५०,५८,१७६·८३ | ३०,९२,२२,८०८·६७ |
| १,४६,४१,५८९ | ( ३ ) दोन अगर अधिक इसमांच्या वैयक्तिक जबाबदारीवर दिलेलीं ( सुरक्षित ) | १,७९,६७,२२३·५१ | |
| नाहीं | ( ४ ) संशयित अगर बुडित कर्जे ( तरतूद न केलेलीं ) | नाहीं | |
| ११,८३,४१,५६४ | | १४,३०,२५,४१०·३४ | |
| ७,०८,७९८ | ( ५ ) बँकेचे संचालक किंवा इतर अधिकारी यांजकडून किंवा ते व अन्य व्यक्ति यांचेकडून वैयक्तिक अगर संयुक्त जबाबदारीवर येणें असलेलीं कर्जे ... | ८,१०,२४४·२७ | |
| १,६६,९०,५२० | ( ६ ) ज्यांत बँकेचे संचालकांचा संचालक, भागीदार, मॅनेजिंग एजंट किंवा, खाजगी कंपन्यांचे बाबतींत, म्हणून हितसंबंध आहे अशा कंपन्या अगर पेढ्या यांचेकडून येणें असलेलीं कर्जे ... | २,८५,१०,५०६·९९ | |
| ८,१५,७४० | ( ७ ) संचालक, मॅनेजर अगर बँकेचे इतर अधिकारी यांचेकडून वरील सदर पांचखाली एका वेळीं येणें असलेली या वर्षांतील जास्तींत जास्त रक्कम ( अल्प मुदतीचीं कर्जे धरून ) ... | ८,३५,३२७·८७ | |
| २,०९,५३,८१३ | ( ८ ) वरील सदर सहाखाली, ज्या कंपनींत अगर पेढ्यांमध्यें संचालकांचा, संचालक, भागीदार, मॅनेजिंग एजंट अगर खाजगी कंपन्यांचे बाबतींत भागधारक म्हणून हितसंबंध आहे अशा कंपन्या अगर पेढ्या यांचेकडून एका वेळीं येणें असलेली या वर्षांतील जास्तींत जास्त रक्कम ( अल्प मुदतीचीं कर्जे धरून ) | २,८५,१०,५०६·९९ | |
| ५२,४२९ | ( ९ ) बँकांकडून येणें असलेलीं कर्जे ... | १७,०९७·८५ | |
| | **६ वसुलीसाठी पाठविलेले चेक, हुंड्या, बिलें वगैरे** ( देणें बाजूकडे दाखविल्याप्रमाणें ) | | |
| २,०३,६४,९२६ | ( १ ) भारतांत वसूल होणारीं ... | २,८५,८६,०४०·७६ | |
| १६,४३,१९० | ( २ ) भारताबाहेर वसूल होणारीं ... | १६,३०,२१२·०४ | ३,०२,१६,२५३·८० |
| | **७ खातिदारांनीं पत्करलेल्या जबाबदाऱ्या** | | |
| २,१९,२४,६२४ | ( देणें बाजूकडे दाखविल्याप्रमाणें ) | | २,५५,२३,४१९·४७ |
| | **८ बँकेच्या इमारती**–घसारा वजा जातां : | | |
| | दि. ३१-१२-१९६२ अखेरची किंमत | १५,९८,४४८·२० | |
| | चालू सालची भर | १,३४,७४१·४८ | |
| | | १७,३३,१८९·६८ | |
| | वजा – घसारा आजतागायत | २,५५,८८९·७३ | १४,७७,२९९·९५ |
| १३,८१,६६० | **९ फर्निचर, फिक्स्चर्स व सेफ डिपॉझिट व्हॉल्ट वगैरे** – घसारा वजा जातां : | | |
| | दि. ३१-१२-१९६२ अखेरची किंमत | १८,५९,१०४·४५ | |
| | चालू सालीं घेतलेलें. | २,९२,४३३·४५ | |
| | | २१,५१,५३७·९० | |
| | वजा – चालू सालीं विकलेले | ६,७००·०० | |
| | | २१,४४,८३७·९० | |
| १२,६२,१२२ | वजा – घसारा आजतागायत | ७,२१,५९७·९० | १४,२३,२४०·०० |
| | **१० इतर मालमत्ता** – ( चांदी धरून ) | | |
| २४,५३१ | स्टँप | २५,७६२·११ | |
| १५,७८,३६० | प्राप्तिकर – आगाऊ भरलेला ( चार वर्षांची कर आकारणी अद्याप पुरी व्हावयाची आहे. ) ... | १६,८३,९९५·०० | |
| ७,५६,७३८ | गुंतवणुकींतील रोख्यांवरील सांचलेलें व्याज ( कर वजा जातां ) ... | १०,३१,७२४·१९ | |
| ३,७४,३३२ | उचल दिलेल्या रकमा | ५,१३,३१२·०० | |
| १,२१,५०० | महाराष्ट्र एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी कंपनी लिमिटेडचे भाग ( अंशतः भरणा झालेले ) | १,२१,५००·०० | ३३,७६,२१३·३० |
| | **११ येण्यापोटीं मिळालेली नॉन-बँकिंग स्वरूपाची मिळकत** | | |
| ७४,००० | ( वसूल होणारी अंदाजी किंमत रु. १४,६३२।- ) ... | | १४,६३२·०० |
| ३०,५५,४७,७२६ | एकूण ... | | ३७,१२,६३,८६७·१९ |

## दि बँक ऑफ

### दि. ३१ डिसेंबर, १९६३ अखेर

| ३१-१२-१९६२ रुपये | खर्च | | रु. न. पैसे | रु. न. पैसे |
|---|---|---|---|---|
| ६३,०७,६४७ | १ ठेवींवर व कर्जाऊ घेतलेल्या रकमांवर दिलेलें व्याज | ... | | ८२,९७,६२३·३१ |
| | २ पगार, भत्ते, प्रॉव्हिडंट फंड व ग्रॅच्युइटी फंड वगैरे | ... | | |
| ३१,२४० | जनरल मॅनेजर ( खालील टीपेप्रमाणें ) | | ३२,६६०·०० | |
| ३४,९२,८५४ | इतर नोकरवर्ग | ... | ४१,९२,५४६·०२ | ४२,२५,२०६·०२ |
| | ३ संचालकांची व स्थानिक सल्लागार समित्यांच्या सभासदांची | | | |
| २५,७९३ | फी व भत्ते | ... | | २६,०५०·०० |
| ४,१७,४४३ | ४ घरभाडें, कर, विमे, दिवाबत्ती वगैरे | ... | | ४,७१,४१५·६९ |
| २०,७७९ | ५ कायदेविषयक बाबींवरील खर्च | ... | | १५,१८५·२८ |
| २,३४,२१९ | ६ टपाल, तार, टेलिफोन व स्टँप | ... | | २,७२,७०३·३५ |
| ५,७०० | ७ हिशेबतपासनिसांचा मुशाहिरा व प्रवासभत्ता | ... | | ५,७००·०० |
| | ८ घसारा, डेव्हलपमेंट रिबेट व कंपनीच्या | | | |
| १,५३,५१३ | मिळकतीस लागलेला दुरुस्तीखर्च | ... | | १,८७,२६७·५५ |
| ३,१४,५८६ | ९ स्टेशनरी, छपाई, जाहिरात वगैरे | ... | | ३,६४,४१३·२२ |
| | १० नॉन बँकिंग स्वरूपाच्या मालमत्तेच्या विक्रींत अगर | | | |
| नाहीं | व्यवहारांत आलेला तोटा | ... | | ६,८००·०० |
| | ११ इतर खर्च | | | |
| २,६६,६०८ | किरकोळ खर्च | ... | २,७६,७००·०९ | |
| ७७,५९२ | प्रवास खर्च | ... | ९९,०८०·२१ | ३,७५,७८०·३० |
| ८,४२,६१२ | १२ निव्वळ नफा | ... | | ९,००,२१३·५४ |
| १,२१,९०,५८६ | | | | १,५१,४८,३५८·२६ |

**टीप :** ( १ ) वरील ताळेबंद व नफा-तोटा-पत्रक १९४९ च्या बँकिंग कंपनी कायद्याच्या तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या 'अ' व 'ब' आराखड्यांनुसार तयार केलीं आहेत.

( २ ) जनरल मॅनेजर यांना मिळणाऱ्या मोबदल्याचा तपशील.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) पगार......... | रु. | २७,६००/- |
| ( २ ) प्रॉव्हिडंट फंडांतील बँकेचा हिस्सा | रु. | २,३००/- |
| ( ३ ) बोनस ( रिझर्व्ह बँकेची मंजुरी मिळाल्यावर द्यावयाचा ) | रु. | २,७६०/- |
| एकूण | रु. | ३२,६६०/- |

### हिशेबतपासनिसांचा भागधारकांस अहवाल

दि. ३१ डिसेंबर, १९६३ चा, दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा, ५० शाखांचे अन्य हिशेबतपासनिसांनीं तपासलेले व आम्ही भेट न दिलेल्या इतर ३८ शाखांचे हिशेबतपासनिसांनीं न तपासलेले तक्ते घेऊन वरील ताळेबंद सदर दिनांकास संपणाऱ्या वर्षाचें नफा-तोटा-पत्रक आम्हीं तपासलें आहे. या ३८ शाखांचे बाबतींत मध्यवर्ती सरकारनें १९५६ चे कंपनी कायद्याचें कलम २२८ चे तरतुदींस अनुसरून हिशेब-तपासणीबाबत सूट देणारा हुकूम काढला आहे.

आम्ही दाखला देतों कीं :—

( अ ) आमचे माहितीप्रमाणें व समजुतीप्रमाणें आमचे हिशेबतपासणीचे कामासाठी आवश्यक असणारी माहिती व खुलासे आम्हांला मिळाले असून ते आम्हांला समाधानकारक आहेत. ( आ ) आमचे निदर्शनास आलेले बँकेचे सर्व व्यवहार बँकेचे अधिकारक्षेत्रांतील आहेत. ( इ ) ( १ ) आमचे मतें, आमचे पाहण्यांत आलेलीं बँकेचीं हिशेबाचीं पुस्तकें कायद्यास अनुसरून ठेवलेलीं आहेत; आणि आमचे हिशेब-तपासणीचे कामासाठीं अवश्य ती माहिती प्रकट करणारे तक्ते शाखांकडून आलेले आहेत. ( २ ) अन्य हिशेबतपासनिसांनीं तपासलेल्या ५० शाखांचे अहवाल आमचा अहवाल तयार करतांना विचारांत घेतले आहेत. ( ई ) आम्ही दाखला देत असलेला बँकेचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हीं बँकेच्या हिशेबाच्या पुस्तकांप्रमाणें व तक्त्यांप्रमाणें बरोबर आहेत. ( उ ) आमच्या मतें, आणि आमच्या माहितीप्रमाणें व आम्हांस मिळालेल्या खुलाशांप्रमाणें वरील ताळेबंद व नफा-तोटापत्रक हीं, त्यांवरील टीपांसह, १९५६ चे कंपनी कायद्याप्रमाणें व बँकिंग कंपन्यांनीं द्यावयास पाहिजे त्या तऱ्हेनें आवश्यक ती माहिती प्रकट करीत आहेत; आणि या भूमिकेवरून वरील ताळेबंद हा दिनांक ३१ डिसेंबर, १९६३ ची बँकेची खरी व वास्तविक स्थिति दर्शवीत आहे आणि वरील नफा-तोटापत्रक हें सदर दिनांकास संपणाऱ्या वर्षांतील नफ्याची खरी व वास्तविक स्थिति दर्शवीत आहे.

पुणें,
दि. १४ फेब्रुवारी, १९६४

जी. डी. आपटे आणि कं,
चार्टर्ड अकौन्टंट्स.

कुलकर्णी ॲन्ड खानोलकर,
चार्टर्ड अकौन्टंट्स.

# विविध माहिती

**ही उणीव दूर करा**—लोकसभेंत फायनॅन्स बिलावर चर्चा चालू असतां खासदार श्री. मोरारका म्हणाले कीं, भारतामधील कर इतर कोणत्याहि देशांपेक्षां भारी आहेत. सध्यांचें बिल मंजूर झालें कीं प्रत्यक्ष कराच्या १२ प्रकारांपैकीं ११ प्रकार अमलांत येतील. उरलेला १२ वा प्रकार पुढच्या अंदाजपत्रकाच्या वेळीं बसवून सरकारनें एवढी उणीव भरून काढावी.

**पिकांच्या नासाडीचें मोठें प्रमाण**—वनस्पतींच्या संरक्षणा-बाबत भारत सरकारला सल्ला देणारे डॉ. एस. सिंग ह्यांच्या मतानें भारतांत दरवर्षी १०० कोटी रुपयांच्या पिकाची नासाडी होते. पिकांवर पडणारी कीड, उंदीर, टोळधाड,इत्यादींमुळें ही हानि होते. कीड आणि कीटक ह्यांच्यामुळें मुख्यतः भात, ऊंस, बटाटे, कांदे, ह्या पिकांची नुकसानी होते.

**अमेरिकेंत चर्चिल ह्यांचें स्मारक**—वयोवृद्ध ब्रिटिश पुढारी मि. विन्स्टन चर्चिल ह्यांचें अमेरिकेंत स्मारक करण्यासाठी प्रे. जॉन्सन ह्यांनीं एक फंड उभारण्याची मोहीम सुरू केली आहे. स्मारकाची वास्तू एका पडलेल्या चर्चच्या दगडांचा उपयोग करून बांधण्यांत येणार आहे. हें चर्च दुसऱ्या महायुद्धांत बॉंबनें उद्ध्वस्त झालेलें होतें.

**चार्ली चॅपलिनचा ७५वा वाढदिवस**—सोव्हिएत रशिआं-तील एका नियतकालिकानें सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन ह्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त एक लेख प्रसिद्ध केला आहे. पाशवी समाजांतील पाशवी कायद्याखाली चिरडल्या जाणाऱ्या सामान्य माणसाची भूमिका त्यांनीं लाखों लोकांत अजरामर केली असें लेखाचें प्रतिपादन आहे.

**शहरांतील मध्यमवर्गासाठी घरें**—मोठ्या शहरांतून मध्यम वर्गाला लागणाऱ्या घरांची अतिशय टंचाई आहे. ही टंचाई दूर करण्याच्या दृष्टीनें आयुर्विमा कॉर्पोरेशननें दोन योजना तयार केल्या आहेत. पहिल्या योजनेप्रमाणें ज्या सार्वजनिक कंपन्या गेलीं पांच अगर अधिक वर्षे नफ्यांत चालत असतील त्यांना त्यांच्या नोकरवर्गासाठी स्वतःचीं घरें बांधतां यावीं म्हणून ५ ते १५ लाखांपर्यंत कर्जे देण्यांत येणार आहेत. दुसऱ्या योजनेप्रमाणें कंपन्यांच्या कायम नोकरांनीं घर बांधण्यासाठी सहकारी सोसायट्या स्थापन केल्यास त्यांना कर्जे देण्यांत येतील.

**सर्कसमधील कलावंतांची दैना**—हिंदमधील सर्कस कंप-न्यांतून १० हजार स्त्री-पुरुष कलावंत कामें करतात. त्यांना पगारहि चांगले असतात. पण त्यांना मालकांकडून चांगली वाग-णूक मिळत नाहीं. कित्येकांना नियमित पगार मिळत नाहीं. त्यांच्या रजेबाबत कांहीं नियम नाहींत. अपघातांत पंगुत्व आल्यास त्यासाठी नुकसानभरपाई मिळण्याची तरतूद नाहीं. सर्कसमध्यें काम करणाऱ्या लहान मुलांना तर कायद्याचें कांहींच संरक्षण नाहीं.

**डालमियांचा कारावास संपला**—कुप्रसिद्ध उद्योगपति, श्री. रामकृष्ण डालमिया, हे आपली दोन वर्षांची शिक्षा भोगून मुक्त झाले. आयर्विन इस्पितळांत पेशंट ह्या नात्यानें ते तुरुंग-वासांत होते. त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येण्यापूर्वीच, उचल केलेल्या २ कोटी रुपयांची त्यांनीं भरपाई केली होती.

**नोटांसाठीं लागणाऱ्या कागदाची गिरणी**—चलनी नोटांना लागणारा कागद तयार करणारी एक गिरणी होशंगाबाद येथें उभारण्यांत येत आहे. १९६५ सालीं गिरणी प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल असा अंदाज आहे. उत्पादन सुरू झाल्यावर दरसाल १ लाख, २० हजार रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल. खास प्रकारच्या ह्या कागदाच्या उत्पादनाची तांत्रिक बाजू शिकण्यासाठी २० लोकांना ब्रिटनमध्यें पाठविण्यांत आलें होतें. ते आतां शिकून परतले आहेत.

**वकिलांनीं खेड्यांत काम करावें**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं वकिलांना खेड्यांत काम करण्याची विनंती केली आहे. रोज चार तास काम करणाऱ्या कोणत्याहि वकिलास लागवडीसाठी दोन एकर जमीन, फुकट धान्य आणि कापूस पुरविण्याची त्यांची तयारी आहे. वकिलांनीं २ तास मुलांना शिकवावें, १ तास प्रौढांना शिकवावें आणि १ तास ग्रामसभेंत लोकांशीं गोष्टी कराव्या असा विनोबांचा सल्ला आहे.

**सिलोनमधील बोलपटांची आयात व वितरण**—सिलोन-मध्यें आयात होणाऱ्या बोलपटांची व त्यांच्या वितरणव्यवस्थेची चौकशी करण्यासाठी सिलोन सरकारनें एक कमिशन नेमलें होतें. कमिशननें केलेल्या अहवालांत अशी शिफारस केली आहे कीं, सरकारनें बोलपटांची आयात व वितरणव्यवस्था आपल्या ताब्यांत घ्यावी. सध्यां सिलोनमधील हा व्यवसाय तामिळ भाषिक आणि मुसलमान लोकांच्या हातीं केंद्रित झाला आहे.

**परदेशीय चलनांची प्राप्ति**—न्यू यॉर्क येथें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांत भारतानें उघडलेल्या दालनामुळें १६ ते २४ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या दालनाच्या उभारणीसाठी जितका खर्च आला आहे, त्याच्या १० ते १५ पट अशी ही प्राप्ति होईल. दालनाच्या उभारणीसाठी सुमारें १६५ लाख रुपये खर्च आला असून त्या-पैकीं १२० लाख रुपये परदेशीय चलनांत आला आहे.

**दारिद्र्याची व्याख्या तरी काय ?**—भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी राज्यसभेंत बोलतांना म्हणाले कीं मोठमोठ्या कॉर्पोरेशन्समध्यें बड्या पगारावर काम करणारे वरिष्ठ अधिकारी सुद्धां स्वतःच्या दारिद्र्याबद्दल कुरकुरत असतात. असाच एक वरिष्ठ अधिकारी आपल्या सवंगड्यांचें प्रतिनिधीमंडळ घेऊन आला होता. त्याचें गाऱ्हाणें त्यांच्या पगाराविषयीं होतें. त्याला दरमहा २,७५० रुपये पगार मिळत होता. तो दरमहा ३ हजार रुपये व्हावा अशी त्याची इच्छा होती. आयुर्विमा कॉर्पोरेशन-मधील धंदा करणाऱ्या एजंटांनाहि त्यांच्या पगारांत अशीच वाढ हवी आहे. मात्र ते मिळवीत असलेल्या धंद्याशीं पगाराचा कांहींहि संबंध असतां कामा नये, अशी त्यांची मागणी आहे.

**१ जूनपासून "पैसा"**—येत्या १ जूनपासून "नया पैसा" ह्या शब्दांतील "नया" हीं अक्षरें रद्द होऊन "पैसा" हेंच नांव राहील. हें नाणें हाताळणें सोपें जावें, म्हणून त्याचा आकार थोडा वाढवावा, असें लोकसभेंतील त्यासंबंधीं बिलावरील चर्चेच्या वेळीं आपलें मत कित्येक सभासदांनीं व्यक्त केलें.

## दी कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.

### कोळपेवाडी कारखान्याचा हंगाम : यशस्वी प्रगतीचा नवा टप्पा

कोपरगांव सहकारी साखर कारखान्याच्या सन १९६३-६४ सालच्या नवव्या ऊंस गळित हंगामाची यशस्वीरीत्या सांगता दिनांक २० एप्रिल १९६४ रोजीं कारखान्याचे विद्यमान संचालक श्री. पंढितराव जाधव यांच्या शुभहस्तें झाली. ह्या हंगामांतील १८० दिवसांत कारखान्यानें १,७४,००० मे. टन उंसाचें गळित केलें व २,०७,००० पोतीं साखर-उत्पादन केलें.

ह्या हंगामांत ऊंसतोडणी व वाहतुकीसाठी खानदेश, पाथर्डी, संगमनेर या भागांतून अंदाजें ३,००० कामगार आलेले होते. ऊंसतोडणी व वाहतुकीच्या कामांतील अडीअडचणी सोडविण्याच्या कामीं कारखान्यानें पुढाकार घेतला व ह्या कामगारांच्या वेतनांत वैशिष्ट्यपूर्ण वाढ केली. ह्यामुळें कारखान्यास मजुरांचा तोटा पडला नाहीं. कारखान्याच्या ह्या कार्यांत ज्या ऊंसतोडणी व वाहतूक कामगारांनीं हातभार लावला त्यांना बोनस म्हणून कारखान्यानें रु. ८५,००० चें वांटप केलें.

महाराष्ट्र राज्यांतील सहकारी तत्त्वावर चालणारा हा दुसऱ्या क्रमांकाचा साखर कारखाना असून अल्पावधींत ह्या कारखान्यानें आपल्या यशस्वी प्रगतीचा टप्पा गांठला आहे. कारखान्यानें केलेल्या प्रगतींतील प्रमुख वैशिष्ट्यावरून कारखान्याच्या यशस्वी वाटचालीची सहज कल्पना येईल.

( १ ) इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून कारखाना उभारणीसाठी घेतलेले बारा वर्षांच्या मुदतींत फेडण्याचे ४० लाख रुपयांचें कर्ज कारखान्यानें फक्त आठ वर्षांत फेडलें.

( २ ) कारखान्याच्या भागभांडवलांत महाराष्ट्र सरकारनें १० लाख रुपयांचे भाग घेतलेले आहेत. त्या भागभांडवलाची परतफेड हें सहकारी वर्ष ( ३० जून १९६४ ) संपण्याच्या आंत कारखाना करणार आहे.

( ३ ) कारखान्यास झालेल्या नफ्यांतून कामगारांचा वांटा म्हणून दरवर्षी दोन महिन्यांचा बोनस देण्यांत येतो. १९५८-५९ व १९५९-६० या सालच्या वांटलेल्या बोनसपैकीं जादा एक एक महिन्याचा बोनस कारखान्यानें ह्या वर्षीं आदा केला आहे. तसेंच सेंट्रल वेज बोर्डानें लागू केलेली वेतनश्रेणी मागील फरकासह कामगारांना देण्यांत आली असून कामगारांना राहण्यासाठी सबसिडाईज्ड हाउसिंग स्कीमअन्वयें बांधलेल्या क्वार्टर्सबरोबर पक्क्या क्वार्टर्स राहण्यासाठी कारखान्यानें बांधल्या व त्यामुळें जवळ जवळ सर्व कामगारांना पक्क्या क्वार्टर्समध्यें राहण्याची सोय करण्यांत आली आहे. संचालक मंडळाच्या पुरोगामी धोरणामुळें येथील कामगारवर्ग सुखी झाला आहे.

( ४ ) कारखाना लवकरच त्याच्या जनरल ऑफिससाठी, रु. दोन लाख खर्चून आलीशान इमारत बांधणार आहे.

या प्रगतीकडे दृष्टिक्षेप टाकल्यावर महाराष्ट्र राज्यांतील शेतकरी आपल्या ध्येयाकडे यशस्वीपणें वाटचाल करीत आहेत असें दिसून येईल. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाबरोबर आधुनिक शेती करण्यासाठी सॉईल रिसर्च लॅबोरेटरी काढणें, बुल्डोझर, ट्रॅक्टर्स, इत्यादि यांत्रिक साधनांनीं शेतीव्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणें, अशा प्रकारचा दूरगामी दृष्टिकोण संचालक मंडळानें ठेवला आहे. कारखान्याच्या या प्रगतींत कारखान्याचे विद्यमान चेअरमन श्री. शंकरराव काळे, व्हाईस चेअरमन श्री. बबनराव पांढरे व इतर संचालक कारणीभूत आहेत.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ]   मुगभाट, मुंबई-४.   [ टेलिफोन ७२१००


**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |


*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

**सरदारगृह**

**मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

### क्रमिक पुस्तकांच्या प्रति जप्त

पश्चिम बंगालमधील शाळांतून चालू असलेल्या एका क्रमिक शालेय पुस्तकाच्या ३५ हजार प्रति पोलिसांनीं जप्त केल्या आहेत. ह्या प्रति कॉपीराईट कायद्याचा भंग करून छापण्यांत आलेल्या होत्या. वास्तविक पुस्तक छापण्याचा हक्क पश्चिम बंगाल सरकारच्या शिक्षणखात्याचा आहे. कारण खात्यातर्फे पुस्तक तयार करवून घेण्यांत आलेलें आहे. परंतु कांहीं छापखान्यांनीं आणि प्रकाशकांनीं संगनमत करून सरकारी पुस्तकाप्रमाणें तें छापून घेतलें होतें आणि तें सरकारमान्य किमतीपेक्षा कमी किमतीला विकलें जात होतें. थोडक्यांत म्हणजे शालेय पुस्तकांच्या काळ्या बाजाराचेंच हें प्रकरण होतें. बंगालप्रमाणें इतरहि कांहीं राज्यांत अशा प्रकारची अनधिकृत प्रकाशनें आढळून आलेलीं आहेत.

---

### मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या विवाहाचा दाखला

राशियाचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांचे जांवई सांस्कृतिक दौऱ्यासाठी फ्रान्सला गेले होते. ते इझव्हेस्तिया ह्या सरकारी पत्राचे संपादक आहेत. फ्रान्समध्यें वार्ताहरांशीं बोलतांना ते म्हणाले कीं मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या दीक्षाविषयींचा दाखला उपलब्ध नाहीं. विवाहाच्या वेळीं ह्या दाखल्याची गरज असते हें खरें; पण राशिआंत धर्म आणि राजसत्ता ह्यांची फारकत झालेली असल्यामुळें दीक्षेच्या धार्मिक दाखल्याला कायद्याच्या दृष्टीनें महत्त्व नाहीं, आणि शिवाय विवाहानें बद्ध होणाऱ्या व्यक्ति जर सन्मान्य असतील तर अशा दाखल्याची जरूरहि लागत नाहीं. मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या मुलीनें दाखला नसल्याच्या माहितीला पाठिंबा दिला आहे.

---

### सरकारी मालकीचीं होटेल्स

हौशी प्रवाशांची सोय करण्यासाठी नवी हॉटेल्स बांधण्याचें व तदनुषंगिक इतर सुखसाधनें उपलब्ध करून देण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. हें काम करण्यासाठी एका स्वतंत्र कॉर्पोरेशनची अगर सार्वजनिक कंपनीची स्थापना करण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल २० कोटी रुपये असेल. येत्या दोनतीन महिन्यांतच सरकार जरूर तीं पावलें टाकील. मि. कॉनरॅड हिल्टन ह्या अमेरिकन उद्योगपतीनें ह्या बाबतींत सरकारला कांहीं योजना सुचविल्या आहेत.

---

### मध्यप्रदेशांतील धरणासाठी यंत्रसामग्री

मध्यप्रदेश सरकारनें दुर्ग जिल्ह्यांत बांधण्यांत येत असलेल्या धरणाच्या कामासाठीं रशिआकडून यंत्रसामग्री घेण्याचें ठरविलें आहे. ह्या बाबतच्या करारांतील अटी आतां अंतिम स्वरूपांत तयार झाल्या आहेत. राशिआ धरणाच्या बांधकामासाठीं ६८ लाख रुपयांची यंत्रसामग्री पुरविणार असून ती ६ महिन्यांत हातीं येईल. ह्या धरणांतून भिलई येथील पोलाद कारखान्याला पाणी पुरविलें जाईल.

---

### त्राटिकांना ताळ्यावर आणण्यासाठी

आपल्या कजाग स्वभावानें पतीला सळो कीं पळो करणाऱ्या स्त्रियांना संमोहनविद्येंतील तज्ज्ञांकडे पाठवावें अशी सूचना लंडनमधील एका डॉक्टरनें केली आहे. एखादाला सारखा त्रास देणें किती दुःखमय आहे हें हा तज्ज्ञ त्यांच्या मनावर बिंबवील आणि मग त्राटिकेचा अवतार समाप्त होईल अशी डॉक्टरांची अपेक्षा आहे.

---

### रासायनिक युद्धांतील पाऊल

अमेरिकेंतील एका अणुशक्तीच्या कारखान्यांत युद्धांत वापरण्यासाठीं अतिशय विषारी असा वायु तयार करण्यांत येऊं लागला आहे. ह्या विषारी वायूचा परिणाम नसावर होऊन जिवंत प्राणी ४ मिनिटांच्या आंत गतप्राण होतो असें तज्ज्ञांचें मत आहे. आक्रमकांना पायबंद घालण्यासाठी ह्या वायूचें उत्पादन अमेरिकेंत गेलीं तीन वर्षें चालू आहे.

---

### विशाखापट्टम् येथें पोलादाचा कारखाना

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत विशाखापट्टम् येथें एक पोलादाचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता २५ लाख टनांची असेल. कारखाना उभारण्यासाठी ३०० कोटी रुपयांचा खर्च येईल. सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांतील हा पांचवा पोलादाचा कारखाना होईल. बोकेरो येथें उभारण्यांत यावयाचा कारखाना ४ थ्या क्रमांकाचा आहे.

---

### रशिआकडून ध्वनिक्षेपक मिळविण्याचा प्रयत्न

अखिल भारतीय नभोवाणीच्या परदेशांसाठी होणाऱ्या ध्वनिक्षेपणास उपयोगी पडेल असा शक्तिशाली ध्वनिक्षेपक राशिआकडून मिळविण्याची खटपट करण्यांत येत आहे. भारताला १ हजार किलोवॅट शक्तीच्या ध्वनिक्षेपकाची फार गरज आहे. कारण चीन आपल्या परदेशीय कार्यक्रमासाठी असाच ध्वनिक्षेपक वापरीत आहे. त्यामुळे भारत चीन वादांतील चीनची बाजू परदेशांत अधिक चांगली समजली जाते. असा शक्तिशाली ध्वनिक्षेपक युरोपमधील देशाकडून मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत. युरोपमधील कोणताहि देश असा ध्वनिक्षेपक ३ वर्षांच्या आंत देऊं शकत नाहीं असें आढळून आलें आहे.

---

### रंगून शहरांतील हिंदी नागरिकांचीं दुकानें

ब्रह्मदेशाच्या क्रांतिकारी सरकारनें दुकानांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविल्यानंतर हिंदी नागरिकांच्या मालकीचीं सुमारें १५०० दुकानें आपल्या ताब्यांत घेतलीं आहेत. ह्या दुकानदारांच्या मालकीच्या मालमत्तेची नक्की किंमत अद्याप समजलेली नाहीं. परंतु प्राथमिक अंदाजाप्रमाणें ही मालमत्ता सुमारें ५ कोटी रुपयांची असावी. ब्रह्मदेशाच्या सरकारनें संबंधित दुकानदारांना योग्य ती नुकसानभरपाई देण्याचें कबूल केलें आहे. परंतु मालमत्ता भारतांत नेण्यासाठी मात्र सवलती देण्यांत आलेल्या नाहींत. ह्या प्रश्नाकडे भारत सरकारचें लक्ष वेधण्यांत आलेलें आहे.

---

### परदेशांच्या दौऱ्यावर झालेला खर्च

१९६२ सालीं भारत सरकारचे मंत्री, त्यांचे दुय्यम मंत्री आणि लोकसभा चिटणीस ह्यांनीं परदेशांत २३ दौरे काढले, आणि त्यासाठीं परदेशीय चलनाच्या स्वरूपांत ४० हजार रुपयांवर रक्कम खर्च झाली. त्याच वर्षी मध्यवर्ती सरकारच्या वरिष्ठ नोकरांनीं ६५९ परदेशीय दौरे केले. त्यांच्या परदेशीय प्रवासासाठी सुमारें १७ लाख, ४२ हजार रुपयांचें परदेशीय चलन लागलें. ह्यांपैकी मंत्र्यांच्या ६ दौऱ्यांत आणि अधिकाऱ्यांच्या ४५ दौऱ्यांत परदेशीय चलनांतील खर्च लागला नाहीं. परदेशीय चलनाच्या खर्चाचा हा आंकडा संपूर्ण नाहीं. कारण, कांहीं ठिकाणीं दौऱ्यांच्या खर्चांतील कांहीं भाग स्थानिक सरकारनें सोसला आहे.

---

## परदेशीय चलनासाठी बेडकांच्या पायांची निर्यात

शरीरधारणेसाठी अन्नाची आवश्यकता असली तरी जिभेचे चोचले पुरविण्यासाठी खुमासदार खाद्यपदार्थांची निर्मिति कोणत्या मर्यादेपर्यंत करावी हें सांगणें कठीण आहे. मांसाहारी लोक हे चोचले पुरविण्यांत एकंदरीनें अधिक पुढारलेले दिसतात. त्याबद्दल शाकाहाराच्या पुरस्कर्त्यांकडून त्यांच्यावर कडक टीकाहि केली जाते. तथापि जिव्हालौल्य ही बाबच अशी आहे, कीं तिच्या आहारीं गेलेला माणूस फक्त चवीचाच विचार करूं लागतो. वास्तविक बेडूक हा प्राणी दिसायला ओंगळ; वैद्यकीय संशोधनासाठीच त्याचा वापर सामान्यतः केला जातो. केरळमधून मात्र बेडकांच्या पायांची निर्यात करून परदेशीय चलन मिळविण्यांत येत आहे. पश्चिम युरोपांत ह्या पायांपासून कांहीं चमचमीत खाद्यपदार्थ तयार करण्यांत येतात. त्यामुळें बेडकांच्या पायांना तिकडे फार मोठी मागणी आहे. केरळमध्यें अनेक ठिकाणीं छोटीमोठीं तळीं आहेत आणि त्यांत बेडकांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. लहान मुलें बेडूक पकडून त्यांचे पाय तोडतात आणि ते निर्यात व्यापाऱ्यांना विकतात. ह्या निर्यातीमुळें दरसाल ५० लाख रुपये मिळतात. केरळ राज्यांतील कुहनाड भागांत हा धंदा विशेष जोरानें चालतो. हा जिल्हा भाताच्या शेतीच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. भाताच्या खाचरांतील बेडूक पिकावर पडणारी कीड खाऊन जगतात आणि भाताला जगवतात असें अनुभवी शेतकऱ्यांचें मत आहे. ही गोष्ट खरी असेल तर बेडकांच्या नाशामुळें भाताच्या पिकाला धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे. भारताच्या कांहीं भागांत बेडूकसत्रामुळें भाताचें पीक कमी आल्याच्या तक्रारी ह्यापूर्वी करण्यांत आलेल्या आहेत.

## ग्रामीण भागांतील कुटुंबनियोजनाचे प्रयत्न

आंध्र प्रदेश सरकारच्या आरोग्यखात्यातर्फे ग्रामीण भागांत कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्याचा एक व्यावहारिक प्रयोग करण्यांत आला. ह्या प्रयोगांत आलेला अनुभव ग्रामीण भागांत कुटुंबनियोजनाच्या प्रचाराला व प्रसाराला येणाऱ्या अडचणींची चांगली कल्पना देतो. हैद्राबाद शहराच्या आसपासचीं १० खेडीं प्रयोगासाठी निवडण्यांत आलीं होतीं. खेड्यांतील लोकांना कुटुंबनियोजनामुळें होणाऱ्या फायद्याची कल्पना करून देण्यांत आली व प्रत्येक कुटुंबाला कुटुंबनियोजनाचीं साधनेंहि पुरविण्यांत आलीं. ग्रामीण भागांतील लोकांचा विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीनें त्या साधनांचा सांठा ठेवणारीं व त्यांचें वितरण करणारीं माणसेंहि ग्रामस्थांच्या पुढाऱ्यांनींच निवडलीं होतीं. एका वर्षानंतर दिलेल्या साधनांचा कसा काय उपयोग करण्यांत आला हें पाहण्यासाठी तपासणी करण्यांत आली. तेव्हां असें आढळून आलें कीं, फक्त २ टक्के कुटुंबांनीं दिलेल्या साधनांचा वापर चालू ठेवला होता. ७५ टक्के कुटुंबांच्या मतानें ह्या साधनाचा उपयोग करणें कटकटीचें ठरलें होतें. कांहीं महिन्यांपूर्वी पतिआळा भागांतहि असाच प्रयोग करण्यांत आला होता. तेथील बहुसंख्य स्त्रिया कुटुंबनियोजनाचीं साधनें वापरण्याच्या विरुद्ध आढळून आल्या; त्यांच्या मतानें साधनें वापरणें अनैसर्गिक आहे. ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांत कुटुंबनियोजनाचा प्रसार झाल्याशिवाय लोकसंख्येच्या वाढीला परिणामकारक आळा बसणार नाहीं हें उघडच आहे. परंतु, ग्रामीण जनतेचीं मनें अद्याप तयार झालेलीं नाहींत. अशा परिस्थितींत प्रचार चालू ठेवणें, एवढाच उपाय आहे.


# दि सरदार कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी**

आणि

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६२११९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कॅंट ) टे. १०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०२
४ कलकत्ता–२०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर प. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.